जीवनातली छोटीशी खुशी ही मोठ्या सुखाचा आधार असते

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार ६ जून २०२५ | अंक १७३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# लाडक्या बहिणीसाठी सामाजिक न्याय विभागाला पुन्हा फटका

लाडकी बहीण योजनेने अनेक विभागांच्या घशाला कोरड लावली आहे. या खात्यांचा हक्काचा निधी वळवण्यात येत असल्याचे समोर आले आहे. यामध्ये सर्वाधिक फटका सामाजिक न्याय विभागाला बसला आहे. ‘लाडकी बहीण’साठी सामाजिक न्याय विभागाला पुन्हा फटका बसला आहे. या खात्याचा 410 कोटींचा निधी वळवल्याचे समोर आले आहे. लाडक्या बहिणींसाठी राज्य सरकारची पैशांची जमवा-जमव करताना दमछाक होताना दिसत आहे. सामाजिक न्याय विभागाचा निधी सलग दुसऱ्यांदा लाडकी बहीण योजनेसाठी वळवण्यात आला. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा 410.30 कोटींचा निधी यापूर्वी वळवण्यात आला होता. आताही तितकाच निधी या योजनेसाठी वळवण्यात आला आहे. आतापर्यंत एकूण 820 कोटी 60 लाख रुपये वळवण्यात आले आहे. या खात्याचे मंत्री आणि शिवसेनेचे शिलेदार संजय शिरसाट यांनी विभागाचा निधी योजनेसाठी वळवल्याप्रकरणी आगपाखड केली होती. त्यांनी उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर तोंडसुख घेतले होते. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजितदादांची पाठराखण केली होती. आता पुन्हा या खात्याचा निधी वळवल्याने वादाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे.

दोन खात्यांचा 1,827 कोटींचा निधी वळवला सामाजिक न्याय तसेच आदिवासी





विभागाचा 1,827 कोटी 70 लाख कोटींचा निधी महिला व बाल विकास खात्याकडे वळवण्यात आला आहे. लाडकी बहीण योजनेत सध्या दरमहा 1500 रुपयांची मदत देण्यात येते. पात्र लाभार्थी महिलांना हा निधी थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यात येतो. पण आता निधीची तरतूद करताना राज्य सरकारची दमछाक होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे इतर खात्यासाठी तरतूद करण्यात येत असलेल्या निधीला कात्री लागल्याचे समोर येत आहे.

## 410.30 कोटींचा निधी वळवला

या योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी पुन्हा एकदा वळवण्यात आल्याची माहिती आहे. लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागातील अनुसूचित जाती घटकांसाठीचा 410.30 कोटींचा निधी वळवण्यात आला आहे. सामाजिक न्याय विभागाला गेल्या 5 वर्षांच्या तुलनेत यावर्षी 7,317 कोटी रुपयांच्या निधीची तूट आहे. त्यामुळे यावरून पुन्हा एकदा वादाची ठिणगी पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन मंत्री पंकजा मुंडे

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बृहन्मु ंबई महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने गिरगाव चौपाटी येथे एकल प्लास्टिक निमू ंलन मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे यांच्यासह विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, महापालिकेचे स्वच्छता कर्मचारी व सामान्य नागरिक उपस्थित होते. यावेळी श्रीमती मुंडे व श्री. कदम यांनी गिरगाव चौपाटीची पाहणी करून या ठिकाणी कशा प्रकारे स्वच्छता केली जाते याची माहिती घेतली. तसेच यावेळी त्यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांबरोबर स्वच्छताही केली. श्रीमती मुंडे म्हणाल्या की, पर्यावरण व वातावरणीय बदल आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्यावतीने राज्यात २२ मे पासून एकल वापर प्लास्टिक मुक्तीसाठी मोहिम राबविण्यात येत आहे. एकल वापर प्लास्टिकला नाही म्हणायचे आहे, त्याचा वापर पूर्णपणे बंद करायचे आहे. आहे त्या प्लास्टिकचा पुनर्वापर कसा करायचे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी विविध ट्रस्टचा सहभाग घेत आहोत. विविध धार्मिक स्थळ, रुग्णालये, वैद्यकिय दुकाने आदी विविध ठिकाणी प्लास्टिकचा वापर रोखण्यासाठी जनजागृती करत आहोत.झाडे लावून ती जतन करा, प्लास्टिकचा वापर करणे टाळा, पाण्याची बचत करा, सौरऊर्जा, सायकल वापरणे यासारख्या पर्यावरणपूरक पर्यायांची निवड करा, कापडी पिशव्या वापरा याबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी विविध संस्थांनी पथनाट्याद्वारे एकल वापराच्या प्लास्टिक बंदीसंदर्भात जनजागृती केली. यावेळी मुक्ताई घनकचरा व्यवस्थापन सेवा संस्था या संस्थेचे सदस्य तसेच जोशीबेडेकर महाविद्यालयासह विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकल वापराच्या प्लास्टिकविरुद्ध घोषवाक्याद्वारे जनजागृती केली व चौपाटीतील कचरा स्वच्छ करून स्वच्छता मोहिमेत सहभागी झाल

# सरकारी औषधांची उकांडा तलावाच्या परिसरात विल्हेवाट ; तलावावर पाणी पिण्यासाठी येणा-या जनावरांना वाढवलाय धोका ;जिल्हा आरोग्य आधिका-यांना तक्रार:- डॉ.गणेश ढवळे

पाटोदा:- ( दि.०५) अयोग्य पद्धतीने औषधांची विल्हेवाट लावल्यास औषधे माती,पाणी आणि हवेत प्रवेश करून पर्यावरणाला आणि मानवाच्या आरोग्याला धोका होऊ शकतो आणि पाळीव प्राण्यांना, गुरांना विषबाधा होऊ शकते.त्यामुळे त्यांची शास्त्रोक्त पद्धतीने सुरक्षितपणे विल्हेवाट लावण्याची आवश्यकता असते. मात्र पाटोदा तालुक्यातील उकांडा गावाजवळील तलावावर मोठ्या प्रमाणावर शासकीय औषधे अस्ताव्यस्त पसरलेल्या अवस्थेत तसेच जाळण्याचा गंभीर प्रकार आढळून आला असुन संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा मुख्य प्रचार प्रमुख माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना केली आहे.



पाटोदा तालुक्यातील उकांडा गावाजवळील गावतलावाजवळ मुदतबाह्य शासकीय औषधांचा साठा अस्ताव्यस्त फेकुन दिलेल्या अवस्थेत आढळून आला असुन टॅबलेट, सिरप,सचेट ,पावडर , सलाईनच्या बाटल्या यासारखे औषध आहे. तसेच जाळण्याचा प्रयत्न केलेला दिसुन येत आहे.तलावाच्या ठिकाणी दररोज पाणी पिण्यासाठी जनावरे येतात. या मुदतबाह्य औषधी सेवन जनावरांना विषबाधा होऊ शकते. औषध गोळ्या,सलाईनच्या बाटल्या, औषधांच्या बाटल्या आढळून आल्या असुन या ठिकाणी औषधे कोणी फेकून दिली. हा संशोधनाचा विषय असुन संबंधित प्रकरणात चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# वडवणी पोलिसांकडून तरुण मुलांचे लग्न करून देण्याच्या बहाण्याने पैसे लूट करणारी टोळी गजाआड

. दिनांक 03 जून 2025 रोजी वडवणी पोलीस स्टेशन येथे मनीषा नरेंद्र ननावरे वय 25 वर्षे राहणार संगमनेर, ही तिची मैत्रीण वैभवी राम शेटे राहणार, संगमनेर,अहिल्यानगर हिला घेऊन आली व तिने पोलिसांना माझ्या मैत्रिणीला तिचे घरच्यांनी डांबून ठेवले होते व मी तिला सोडवले अशी हकीकत कथन केली, सुरुवातीला महिला अधिकारी या नात्याने वडवणी प्रभारी API वर्षा व्ह गाडे यांनी वैभवी व मनीषा हिची व्यवस्थित प्रेमाने चौकशी केली, तसेच सोडवणूक करणाऱ्या ड्रायव्हरला देखील बोलवून घेतले, परंतु या तिघांनाही बोलवून घेतल्यानंतर तींघांची स्वतंत्र चौकशी केली असता मनीषाचे दोन दिवसापूर्वी नुकतेच गणेश बंडू घाडगे व 28 वर्षे राहणार उपळी, वडवणी या तरुणाशी लग्न झालेले असून त्यांनी सध्या लग्नासाठी मुली मिळत नाही आजारासाठी मनीष्याच्या मावशीला व तिच्या काकाला त्यांनी तीन लाख रुपये नगदी दिले असे कळाले, तसेच मनीषा कडे वेगवेगळे आधार कार्ड असून तिचे काका व मावशी हे देखील नकली असल्याचे समजले, लग्नासाठी मुली मिळत



नसल्याने अनेक गरीब सर्वसाधारण,तसेच प्रतिष्ठित कुटुंबांना अशांचा शोध घ्यायचा, लग्न होत नसल्या तरुणांना सुंदर मुलगी दाखवणे,नंतर तिच्या आईला कॅन्सर झाला आहे, किंवा तिला आई-वडीलच नाहीत किंवा इतर आर्थिक अडचण सांगून पैसे उकळणे, व पुन्हा पैसे घेवुन पळून जाणे किंवा पळून जायला जमले नसल्यास त्याच कुटुंबा विरुद्ध पोलीस स्टेशन येथे जाऊन तक्रार दाखल करणे, आणि अशावेळी त्या कुटुंबाने फसवणुकीच्या तक्रारीबाबत माघार घेणे, मी पुन्हा नवीन ग्राहक शोधणे, अशी या टोळीची गुन्हे करण्याची पद्धत आहे. रणजीत अहिरे या आरोपीच्या MH-17AE 2889 मारुती सुझुकी या गाडीचा मुलगी दाखवण्यासाठी तसेच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी वापर करत असे, यामध्ये आतापर्यंत वडवणी पोलिसांनी 1)वैभवी शेटे( नवरी), 2) मनीषा ननावरे (नवरीची मैत्रीन) 3) रणजीत अहिरे( ड्रायव्हर) तिघेही राहणार संगमनेर अहिल्यानगर व 4)यमुनाबाई शिंदे,( मध्यस्थी) यांना अटक केली असून यात एकाच नावाचे विविध आधार कार्ड, व एक चार चाकी असा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त आहे.तरी अशा प्रकारचे प्रकरणे आल्यास त्याला बळी लग्न जुळवण्यासाठी कोणत्याही प्रकारे पैसे देऊ नये असे आव्हान बीड पोलिसांनी नागरिकांना केले आहे. ही कारवाई अधीक्षक नवनीत कावत व अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणीच्या प्रभारी अधिकारी Api वर्षा व्हगाडे, psi संजय राठोड, psi राजू राठोड, पुरुष अंमलदार विलास खरात, अविनाश गवळी व महिला पोलीस सुवर्णा खोसे यांनी केली.

# चर्चेगेट रेल्वे स्थानकात लागलेली आग आटोक्यात, शॉर्टसर्किटमुळे सर्वत्र धूर अन् प्रवाशांची एकच धावपळ

मु ंबई। प्रतिनिधी चर्चगेट रेल्वे स्थानकात आग लागल्याने एकच गोंधळ उडाला. स्थानकातील मॉन्जिनिज केकशॉपमध्ये शॉर्टसर्किट होऊन ही आग लागली होती. त्यानंतर अग्निशमन दलाला ही आग आटोक्यात आणण्यात यश आलं. मात्र या आगीमुळे धुराचे लोट मोठ्या प्रमाणात उठल्याने प्रवाशांची एकच धावपळ झाल्याचं दिसून आलं. दरम्यानच्या काळात काही वेळेसाठी स्टेशनचे मुख्य गेट बंद करण्यात आलं होतं. ते आता पुन्हा सुरू करण्यात आलं आहे. चर्चेगेट स्टेशनमध्ये गुरुवारी संध्याकाळी ५ वाजून १० मिनिटांनी ही घटना घडली. आग लागल्यानंतर त्या ठिकाणी धुराचे लोट दिसायला लागले. या ठिकाणी संध्याकाळच्या वेळी घरी परत जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी होती. त्याचवेळी ही आग लागल्याने स्टेशनमधील कॉरिडॉरमध्ये धूरच धूर दिसायला लागला. त्यानंतर लगेच कॉरिडॉर आणि त्याला जोडणारा भूयारी मार्ग बंद करण्यात आला. या आगीची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन दल त्या ठिकाणी लगेच पोहोचलं.

# ट्रॅक्टर चोरी करणा-या टोळीतील आरोपीस स्था.गु.शा.बीड ने केले जेरबंद

दिनांक 30/05/2025 रोजी फिर्यादी नामे विष्णु रामकिसन तांबडे रा.चिंचवण ता.वडवणी जि.बीड यांनी फिर्याद दिली की,दि.26/05/2025 फिर्यादी यांचा पुतण्या याने फिर्यादीच्या शेतामध्ये दिवसभर ट्रॅक्टरने शेतनांगरट करुन रात्री 07.00 वा सुमारास ट्रॅक्टर गोठयाजवळ उभा केला होता. दि.27/05/2025 रोजी सकाळी 06.00वा. सुमारास फिर्यादी यांचा भाऊ याने फोनकरुन सांगीतले की, काल रात्री गोठयाजवळ नांगरासह उभा केलेला ट्रॅक्टर हा गोठयाजवळ दिसत नाही. फिर्यादी याने चिंचवण- धारुर- केज भागात ट्रॅक्टरचा शोध घेतला असता तो मिळुन आला नाही. या वरुन सदरचा ट्रॅक्टर कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरी केला असल्याचे फिर्यादी यांची खात्री झाल्याने पोलीस ठाणे वडवणी येथे गुरनं 147/2025 कलम 303(2) BNS प्रमाणे ट्रॅक्टर चोरीचा गुन्हा नोंद केला होता. मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी उघडकीस न आलेल्या गुन्हयाचा आढावा घेवुन उघडकीस न आलेले वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस उप- निरीक्षक श्री. महेश विघ्ने यांनी अभिलेखावरील उघडकीस न आलेल्या गुन्हयांचे विश्लेषण अभिलेखावरील गुन्हेगारांची माहिती काढत असतांना दिनांक 03/06/2025 रोजी गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हया हा 1) दिपक महादेव चाटे वय 19 वर्षे रा.तांबवा ता.केज.जि.बीड 2) अमोल सुधाकर घायतीडक वय 21 दोन्ही रा.चिंचवण ता.वडवणी जि.बीड 3) समाधान कोंडीराम मुंढे वय 20 4) सचीन सतीष मुंढे वय – 19 वर्षे दोन्ही रा. चोंडी ता. धारुर जि.बीड यांनी मिळुन चोरला आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाले वरुन आम्ही लागलीच टिम सह सदर आरोपीतांचे शोध कामी तांबवा येथे जावुन यातील आरोपी नामे दिपक महादेव चाटे याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन



त्यास गुन्हया बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली देवुन सदर गुन्हा उघडकिस आणला आहे. त्याचे ताब्यातुन चोरीकेलेला ट्रॅक्टर नांगरासह कि.4,35,000/- किंमतीचा जप्त करुन ताब्यात घेवुन पोलीस ठाणे वडवणी यांचे ताब्यात दिला आहे.सदर आरोपीस दिनांक 05 /06/2025 पर्यंतची पोलीस कोठडी सुणावण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण चार आरोपी आरोपी निष्पन्न झालेले असुन त्यापैकी एका आरोपींस स्था.गु.शा. पथकाने पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे. वडवणी यांचे ताब्यात दिलेले असुन गुन्हयातील उर्रवरीत आरोपीचा शोध शोध पो.स्टे.वडवणी व स्थागुशा बीड करीत आहे. सदरची कामगिरी ही मा. नवनीत कॉवत पोलीस अधीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.शिवाजी बंटेवाड, पोउपनि महेश विघ्ने, पोह/महेश जोगदंड, पोह/राजु पठाण, पोअं/बप्पासाहेब घोडके, पोअं/अश्विनकुमार सुरवसे नेम. स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.

## संपादकीय

# वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे

दरवर्षी ५ जून हा दिवस ङ्गजागतिक पर्यावरण दिनफ म्हणून साजरा केला जातो. पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे, समस्या व संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरणविषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून पोषक वातावरणाची निर्मिती करणे, हा पर्यावरण दिन साजरा करण्यामागचा मुख्य हेतू आहे.पण आता प्रत्यक्षात काही वेगळेच चित्र दिसते आहे. माणसाने निसर्गाला स्वत:ची एकट्याची मालमत्ता असल्यासारखे वापरून घेतले. वृक्षतोड, जंगल छाटणी, खनिज शोधासाठी खाणी खोदकाम, प्लास्टिकचा अतिवापर, हवा, नद्या, समुद्र यांचे प्रदूषण अशा अनेक गोष्टींनी आपण पर्यावरणाचे संतुलन बिघडवले. या पृथ्वींवरील कितीतरी प्राण्यांच्या, वनस्पतींच्या प्रजाती माणसांमुळे नष्ट झाल्यात.

टास्मानियन वाघ, आफ्रिकन गैंडा, डोडो बदक ह्या सारखे प्राणी आपण फक्त आत्ता चित्रात बघू शकतो.हि जैवविविधता आपण जपली पाहिजे. या पर्यावरण संवर्धनासाठी, आपण नागरिकांनी जागरूक होण्यासाठी या निसर्गाचा अभ्यास करण्यासाठी हा पर्यावरण दिन साजरा केला जातो.

पृथ्वीवर वेळी-अवेळी पाऊस, भूकंप, पेटलेले वणवे, अचानक येणारी वादळे याकडे आपण सजगपणे पाहिले पाहिजे. मानवी जीवन कितीही प्रगत झाले तरी ते निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाचे संवर्धन हे आपलेच संवर्धन आहे हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. ही जबाबदारी अगदी प्रत्येकाची आहे ,मोठ्या जाणकार माणसांसोबतच लहान मुलेसधा या महत्त्वाच्या कामात खारीचा वाटा उचलू शकतो. घरातला कचरा औंला व सुका वेगळा करू शकतो. घरात व गच्चीत विविध झाडे लावू शकतो. प्लास्टिकचा कमी वापर करून आपल्याकडे असेलेले प्लास्टिक विघटनासाठी वेगळे करू शकतो. आजूबाजूच्या पक्ष्यांची काळजी घेऊ शकतो. हे विश्वची माझे घर हा विशाल व भव्य दृष्टीकोन आहे. आपल्या कुटुंबा पुरते मर्यादित न रहाता सारे विश्व कुटुंब असून आपण त्यातले एक आहोत ह्या उद्दात हेतूने जीवन जगले पाहिजे.आपल्यालाही सर्वांबरोबर राहावे असे वाटते . सर्व पशु, पक्षी एकत्र कळपाने राहतात, कारण त्यात एक प्रकारची सुरक्षितता असते. एकटेपण म्हणजे भीतीचे घर असते. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे प्रेम. प्रेमाशिवाय जगणे शक्य नाही. प्रेम ही माणसाची प्रथम गरज आहे. भावनात्मक सुरक्षितता प्रेमातच मिळते. जीवनातील सर्वात सुंदर गोष्ट प्रेम आहे. प्रेम म्हणजे आनंद, म्हणून प्रेम देतं व घेतं, सर्वांनी साथीने जीवन यात्रा करायची असते.निसर्गाकडे पहिले तर सारे एकमेकाच्या सहवासात असतात. पाखरे झाडांवर रहातात, पाण्यात मासे इतर प्राणी रहातात, फुलांवर फुल पाखरे आनंदाने बागडतात. चंद्र, सूर्य, वारा, पाऊस, पृथ्वी साऱ्यांचे पालन पोषण करतात, हा निसर्ग आपल्या सर्वांसाठी आहे. त्याच्या कुशीतच आपण वाढतो, जगतो. विश्वात सहजीवन आहे प्रेम आहे म्हणून आनंद आहे. एकटेपणात दु:ख आहे म्हणून हे विश्वची माझे घर या विशाल हृदयाने, सर्वाना सामावून घेतले पाहिजे. सर्वाना आपल्या बरोबर घेऊन चालायचे आहे. त्यातच सार्थकता आहे. निसर्ग, पशु, पक्षी सर्व स्वधर्माप्रमाणे रहातात. माणसानेही निसर्गाकडून शिकून आपला स्वधर्म पाळाला पाहिजे,हो ना....!!

हिरकणी सौ.अनिता गुजर
डोंबिवली
८०९७५२४१९७

# स्त्रीच्या अस्तित्वाचा शोध घेणारा काव्यसंग्रह म्हणजे जन्म बाईचा..बाईचा

दि. २५ मे,२०२५ रोजी ऐतहासिक नगरी छत्रपती संभाजीनगर येथे पहिले राज्यस्तरीय वारसा कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला. या पुस्तक प्रकाशन सोहळ्यामध्ये कवयित्री श्रीमती मनिषा एम. पिंगळकर यांचा 'जन्म बाईचा बाईचा' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. गुरुमाऊली प्रकाशनची निर्मिती असलेला हा काव्यसंग्रह एकूण ४५ कवितांचा समावेश आहे. स्त्रीला जन्म घेतल्यापासून अनेक भुमिकामधुन जावे लागते. यामध्ये कधी आंनद ,संघर्ष, वेदना तर कधी सुख, दुःख वाट्याला येत असते. मुलगी, बहीण, पत्नी, आई, मावशी, आत्या, आज्जी इ. नाती जपत असताना तिला खंबीर मनाने, संवेदनशीलपणे, सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आयुष्य जगावे लागते. या सर्व नात्यामधून जात असताना तिचं अस्तित्व काय आहे ? तिचा छंद कोणता? असा छंद जो जीवन जगताना आत्मीक समाधान देईल. स्त्री घरातील जबाबदारी समर्थपणे संभाळताना तिला कधी मृदु तर कधी कणखर व्हावे लागते. स्त्रीला जोडणाऱ्या नात्यांचे विविध पैलू समर्थपणे कवयित्री श्रीमती मनिषा एम. पिंगळकर यांनी 'जन्म बाईचा....बाईचा' काव्यसंग्रहातून मांडले आहेत. स्त्रीशक्तीचा जागर व सन्मान करणारा हा कवितासंग्रह आहे. दैनंदिन जीवनामध्ये जगत असताना लोकांच्या मतांचा फारसा विचार न करता, आतल्या आत झुरत बसण्यापेक्षा प्रत्येक क्षणाचा उत्सव कसा करता येईल उर्जास्त्रोत हा कवितासंग्रह देऊन जातो. एका कवितेतुन म्हणतात की, "स्वतःला वगळून मागे बाकी काही उरत नाही नको त्या गोष्टीसाठी मी आता झुरत नाही" सध्या समाजामध्ये अशी परिस्थिती आहे की, समोरच्या व्यक्तीकडुन अपेक्षा जास्त ठेवतो. अपेक्षाचं ओझं आपण सतत दुसऱ्यावर लादत असतो. 'माझा पुत्र शिवाजी अन् मी जिजाऊ होऊ दे' या कवितेत असं कवयित्री म्हणतात की, "स्त्री सन्मानाची गंगा पुन्हा माझ्या भारतात वाहु दे प्रत्येक पुत्र शिवाजी अन् आई जिजाऊ होऊ दे" शिवाजी महाराज होण्यासाठी आईला जिजाऊ होणं गरजेचं आहे.असा व्यापक दृष्टिकोन, विचार वरील कवितेच्या ओळीतुन व्यक्त होताना दिसतो. खरं तर या जगात दोन व्यक्ती सर्वश्रेष्ठ आहे. मनातलं ओळखणारी आई तर भविष्य घडवणारा बाप. पण बाप आयुष्यातुन ज्यावेळेस निघुन जातो त्यावेळेस त्या बापाच्या आठवणीन होणारं उद्विग्न मन घेऊन जगावं लागतं. तर आईसाठी पापण्याआड अश्रु लपवून ठेवावे लागतात .इथं स्त्रीच्या खंबीर मनाची प्रचिती कवितेमधुन दिसून येते, "माझ्या भेदरलेल्या नजरेची आशा व्हायचे बाबा माझ्या भांबावलेल्या पावलांची दिशा व्हायचे बाबा आईसाठी अश्रू मला ठेवावे लागतात लपून पापण्यांआड असातानाच टाकते त्यांना पुसून" दैनंदिन संसारात वावरताना डोक्यात विचारांचा हैदोस सुरु असतानाही स्त्री सर्व भुमिका जबाबदारीने पार पाडत असते. जसे की पाहुण्यांचा आदरतिथ्य, मुलांचे संगोपन तसेच त्यांच्यावर संस्कार, दैनंदिन व्यवहारातील हिशोब ठेवणे इ. खरं तर डोक्यात विचाराचा कितीही गुंता असला तरी बाहेरच्यांना कळु देत नाही. मुळातच स्त्री खूप सहनशील असते. हे कवयित्रीने कवितेमधुन सक्षमपणे मांडले आहे. पती पत्नीने संसार करत असताना आयुष्यभर एकमेकांची उणे धुणे काढत बसण्यापेक्षा, आपली आवड निवड वेगळी जरी असली तरी पती पत्नीचे नाते किती छान आहे, हे 'नातं तुझ्या माझ्यातलं' या कवितमधुन व्यक्त होताना दिसतं. येणाऱ्या संकटाशी स्त्री कशी सामना करते. तिला आधाराची, सहानुभूतीची गरज नाही. ती इतकी खंबीर होऊन स्वतःचे घाव स्वतः शिवत बसते, "मला न उरली भिती आता पुन्हा तुटण्याची मी तुटुन पुन्हा जोडले स्वतःला तयार उभी पुन्हा चौकटीत संकटाच्या स्वागताला पुर्ण करेल लढा माझा जिद्द माझी देवता आहे त्या देवतेचं हे मन मंदिर आहे मी अजुनी खंबीर आहे " येणाऱ्या प्रत्येक संकटाशी स्त्री संयम ठेवून संघर्ष करत असते हे या कविते मधुन व्यक्त होताना दिसते. जो संघर्ष तिला खंबीर बनवतो. 'बापाच्या माघारी जणु बापच भासावा, प्रत्येक बहीणीला असा एक भाऊ असावा' अश्या प्रकारे बहीण-भावाच्या नात्याचे महत्व सांगत भावाकडून बहिणीची असलेली अपेक्षा व्यक्त होताना दिसते. खरं तर जीवन हे क्षणभंगुर आहे. जेंव्हा जीवनयात्रा संपते त्यावेळेस गाव सुटुन जातं, पाऊलखुणाही मिटुन जातात, ना पाठीवरची थाप, ना काळजावरचा धाव. हे वास्तव कवयित्रीने समर्थपणे मांडलेलं आहे. आजच्या सामाजिक व्यवस्थेमध्ये विवाह जुळवताना बायको कशी पाहीजे? होकारासाठी तिला किती मोठं अपेक्षेचं ओझं सहन करावं लागतं. तसेच तिच्यावर लादलेल्या अपेक्षेमुळे तिचा जीवनप्रवास किती बंधनातून सुरू होतो हे कवितेमधुन व्यक्त होताना दिसत आहे. वय वाढत असताना स्त्रीने स्वतःचे छंद जोपासले पाहिजेत. असे छंद की ज्यामुळे तिला आंनद , समाधान मिळते. घरकाम तर नेहमीच आहे, संसारात तर ती रमली आहे , पण स्वतःला आनंद मिळणा-या छोट्या छोट्या गोष्टी कडे लक्ष दिले पाहीजे. हे या कवितासंग्रहातुन प्रकर्षाने जाणवते. आयुष्य जगत असताना स्त्रीने नेहमी सकारात्मक राहुन आशावादी असणं गरजेचे आहे. पहिल्यांदा ती जेव्हा सासरी जाते तेव्हा तिला अनेक प्रश्न पडतात की, माहेराची आठवण छाळेल का ? इथल्या परी माया तिथं मिळेल का? या नवीन प्रवासात, नविन नाती जोडताना सर्वांचे आशिर्वाद असावेत ,अशी अपेक्षाही ती व्यक्त करते. या कवितासंग्रहाचा शेवट आई कवितेनं केला असुन आईचे महत्व सांगत असताना कवयित्री म्हणतात की, "काळजी आणि प्रेमाचा सतत बरसणारा पाऊस तु, न थकता काम करत राहणारी पावर हाऊस तु, सर्वांना एकत्र बांधुन ठेवणारा रेशीम धागा तु, धावपळीनंतर विसाव्यासाठी राखीव जागा तु" पती- पत्नीच्या नात्यामध्ये मध्ये पतीच्या आनंदाला सर्वस्व मानत असताना पतीच्या प्रती ओढ, काळजी दिसुन येते. जसं की " " ह्या जन्मी तुला मिळवून झाले आहे मी धन्य तुझ्यासारख्या मिळायला केलं असेल मी पुण्य सात जन्मीच नव्हे सगळ्याच जन्मी मला, तुझा हात माझ्या हाती हवा असेल, वडाला पुजल्यानेच हे सिद्ध होत असेल तर पुजेन मी वडाला" 'जन्म बाईचा ...बाईचा' हा कवितासंग्रह म्हणजे चुल आणि मुल यामध्येच अडकुन न राहता, स्वतःच्या अस्तिवाचा शोध घेत नात्यांवरची भक्ती आणि तिचा कणखरपणा सिद्ध करणारा आहे.

# नागापूर खुर्द येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात संपन्न

गुरुवार 5 जुन रोजी बीड तालुक्यातील नागापूर (खुर्द ) या ठिकाणी महाराष्ट्र शासनाच्या जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबवण्यात आले . याप्रसंगी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती . तसेच या कार्यक्रमासाठी मंडळ अधिकारी वंदना विघ्ने , ग्राम महसूल अधिकारी ज्योती बोधवड , अरुण गुरसाळी , विलासजी शिंदे , परमेश्वर काकडे , काजल ससाणे यांची उपस्थिती होती .

या अभियानाअंतर्गत फार्मर आयडी म्हणजेच शेतकरी ओळखपत्र काढून तसेच जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत वारसानुसार तयार झालेले सातबारा तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या हस्ते वाटप करण्यात आले .

याप्रसंगी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी या अभियानातून राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती गावकऱ्यांना दिली . यामध्ये जिवंत सातबारा मोहीम , जातीचे व विविध दाखले वितरण , संजय गांधी व श्रावण बाळ निराधार योजना , नकाशावरील रस्ते खुले करणे , जन्म मृत्यू दाखला ,पीएम किसान




, पुरवठा विभागाची कामे , फेरफार अदालत व विविध अडचणींचे निराकरण करण्यासाठी गावकऱ्यांचे समाधान पूर्वक शंका निरसन करून मोलाचे मार्गदर्शन केले.

1. जिवंत सातबारा मोहीम - मृत खातेदारांच्या वारसांना शेतजमिनीशी संबंधित अधिकार सहज आणि वेगाने मिळावेत यासाठी ' जिवंत सातबारा ' मोहीम राज्यभर राबविण्यात येत आहे .

2. संजय गांधी व श्रावण बाळ निराधार योजनेबद्दल माहिती देण्यात आली .

3. नकाशावरील खुले रस्ते - नागापूर खुर्द मधील अतिक्रमित रस्ते , अडविलेले रस्ते जे गाव नकाशावर आहेत व त्याठिकाणी जायमोक्यावर जाऊन सर्व रस्ते खुले करण्यासाठी त्यावर योग्य मार्ग काढून दिले .

4. फार्मर आयडी : हे किती महत्वाचे आहे आणि शेतकरी ओळखपत्र



काढून कोणता फायदा होत आहे आणि न काढल्याने किती नुकसान होऊ शकते यावर चर्चा करून शेतकरी वर्गाला सरळ आणि स्पष्ट शब्दात आवश्यकता पटवून दिली.

5. पी एम किसान - पी एम किसान बद्दल च्या छोट्या मोठ्या अडी अडचणी जसे की लँड सिडींग, नसेल तर कसे करून घेणे व यासाठी महसूल कार्यालयाची आणि कृषी विभाग मिळून कसे व कोणते काम करते याचे निराकरण केले .

6. फेरफार अदालत - फेरफार अदालत मध्ये सस्ती अदालत अंतर्गत लवकरात लवकर वादग्रस्त प्रकरणे निकाली काढणे व त्यासाठी तहसीलदार यांची कर्तव्ये कोणती याची माहिती दिली .

अशातच बीड तहसीलदार यांनी काही दिवसांपूर्वी बीड तालुक्याला सस्ती अदालत मध्ये प्रथम स्थान मिळवून दिले आहे . त्याबदल म्हाळसजवळा मंडळ तर्फे मंडळ अधिकारी व सर्व ग्राम महसूल अधिकारी त्याच बरोबर गावकऱ्यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा सत्कार केला .

निरोगी जीवन आणि पृथ्वीवरील जीवनाच्या अस्तित्वामध्ये पर्यावरण महत्त्वपूर्ण भूमिका बजावते . पृथ्वी ही विविध सजीव प्रजातींचे घर आहे आणि आपण सर्व अन्न , हवा , पाणी आणि इतर गरजांसाठी पर्यावरणावर अवलंबून आहोत . म्हणूनच , प्रत्येक व्यक्तीने आपल्या पर्यावरणाचे रक्षण आणि संरक्षण करणे महत्वाचे आहे . या विचाराने आज पर्यावरण दिनाच्या निमित्ताने फुल ना फुलाची पाकळी म्हणून एक रोप नागापूर खुर्द च्या शिवारात सर्वांनी मिळून लावले आणि या शिबिराची सांगता केली .

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्राम महसूल अधिकारी काजल ससाणे यांनी विशेष परिश्रम घेतले व आभार प्रदर्शन करून सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपल्याचे घोषित केले .

या शिबिरासाठी गावातील माजी सरपंच विठ्ठल साळुंके , मसुराम साळुंके , विक्रम बाप्पा साळुंके यासह गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती .

## भाविक भक्तांनी परमार्थाचा आनंद घ्यावा - महादेव महाराज चाकरवाडीकर

# प्रतिदिन चार ते पाच लाख भाविक भक्त येणार.. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली भेट..

### दैनंदिन कार्यक्रम

अखंड हरिनाम सप्ताह मध्ये पहाटे ०४ ते ०६ वाजता काकडा भजन, ०६ ते ०७ विष्णू शिव सहस्र नाम, सकाळी ०७ ते १० वाजता ज्ञानेश्वरी पारायण, ११ते १२ गाथा भजन, रोज दुपारी ०१ ते ०४ वाजता प. पूज्य प.प्रदीप मिश्राजी यांची शिवमहापुराण कथा, ०५ ते ०६ हरिपाठ, ०६ ते ०८ अभंगवाणी संगीत भजन, रात्री ८.३० ते १०.३० महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकाराची कीर्तन सेवा, रात्री ११ वाजता भारुड हरिजागर होईल.

### 150 एकर वर असणार पार्किंग ची सुविधा..

माऊली महाराज यांच्या 25 व्या पुण्यतिथी निमित्त होणाऱ्या अखंड हरीनाम सप्ताहामध्ये आंतरराष्ट्रीय कथा प्रवक्ते प्रदीप जी मिश्रा यांची शिवमहापुराण कथा संपन्न होणार आहे. या कथेसाठी महाराष्ट्रातून नव्हे तर देशांमधून 10 ते 12 लाख भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. येणाऱ्या भाविक भक्तांसाठी पार्किंग ची व्यवस्था ही येळंबघाट पासुन 1 किलो मीटर अंतरापासुन ते माऊली मंदिरापर्यंत साधारणत 150 एकर च्या परिसरामध्ये पार्किंग ची व्यवस्था करण्यात आली आहे

### 5 ते सहा एकर वर वॉटरप्रूफ मंडप

माऊली दादांच्या पुण्यतिथीनिमित्त होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कथा प्रवक्ते प्रदीप जी मिश्रा महाराज यांच्या कथेसाठी महाराष्ट्रमधून लाखोंच्या संख्येने भावी भक्त येणार आहेत येणाऱ्या भाविक भक्तांसाठी पाच ते सहा एकर मध्ये वॉटरप्रूफ मंडप ची व्यवस्था करण्यात आली आहे. गेल्या एक महिन्यांपासून या मंडपची तयारी सुरू आहे.

बीड प्रतिनिधी - विसाव्या शतकातील महान संत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्री क्षेत्र चाकरवाडीकर यांच्या 25 व्या पुण्यतिथीनिमित्त रौप्यमहोत्सवी भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये महत्त्वाचे म्हणजे आंतरराष्ट्रीय कथा प्रवक्ते पंडित प्रदीप मिश्रा महाराज यांची शिवमहापुराण कथा संपन्न होणार आहे. या कथेसाठी महाराष्ट्रातून लाखोच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित राहणार आहेत. या अखंड हरिनाम सप्ताह शनिवारपासून सुरुवात होत आहे. हा सर्व कार्यक्रम तपो निधी शांती ब्रह्म महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. या कथेसाठी या अखंड हरिनाम



सप्ताहासाठी गेल्या एक महिन्यांपासून जोरदार तयारी सुरू आहे. माऊली दादांच्या पुण्यतिथीनिमित्त भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पत्रकार परिषदेमध्ये ह भ प महादेव महाराज तात्या श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांनी केले आहे. पत्रकार परिषदेमध्ये बोलताना भाविक भक्तांनी परमार्थाचा आनंद घ्यावा, या अखंड हरिनाम सोहळ्यामध्ये दररोज चार ते पाच लाख भाविक येणार आहेत, परिसरामध्ये येणाऱ्या भाविक भक्तांच्या राहण्याची सुविधा सुद्धा केली आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःशहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ६ जून २०२५
https://lokaarambh.com


# SQAAF च्या विविध मानकांची माहिती – मेहल्डे सर यांचे मार्गदर्शन



| तालुकास्तर वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षणाच्या चौथ्या दिवशी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन फ्रेमवर्क (SQAAF) मधील विविध मानकांची सविस्तर माहिती सहभागी शिक्षकांना देण्यात आली. या सत्रात साधन व्यक्ती मेहल्डे सर यांनी मार्गदर्शन करताना गुणवत्तापूर्ण शिक्षण, मूल्यांकन प्रक्रिया, शाळा व्यवस्थापन व नेतृत्व आदी मानकांवर सखोल माहिती दिली. सहभागी शिक्षकांनी या मार्गदर्शनाचा उत्स्फूर्त प्रतिसाद देत शंका समाधान सत्रातही सहभाग नोंदवला. प्रशिक्षणात शालेय विकासाच्या दृष्टीने SQAAF चा प्रभावी वापर कसा करावा, यावरही चर्चा झाली.

# विश्व पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण संवर्धनाचे आवाहन

| ५ जून २०२५संपूर्ण जगभराप्रमाणे [आपल्या गाव/शहराचे नाव] येथेही विश्व पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध शैक्षणिक संस्थांत, सामाजिक संघटनांत आणि स्थानिक प्रशासनातर्फे अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावर्षीच्या पर्यावरण दिनाची संकल्पना होती "Our Land. Our Future. We are #GenerationRestoration". या थीमद्वारे जमिनीच्या आणि पर्यावरणाच्या पुनर्संवर्धनावर भर देण्यात आला. कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, जनजागृती रॅली, निबंध व चित्रकला स्पर्धा, तसेच जलसंधारणावरील मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांचा या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग लाभला. स्थानिक पर्यावरण प्रेमी, शिक्षक, पदाधिकारी व ग्रामस्थ यांनी एकत्र येऊन परिसरातील विविध भागांत झाडे लावली. "प्रत्येक व्यक्तीने एक झाड लावावे व त्याचे संगोपन करावे" हा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून देत, प्लास्टिकमुक्त समाज, शाश्वत जीवनशैली, व पाणी वीज बचतीचे उपाय यावरील मार्गदर्शन दिले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांकडून नागरिकांना पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले. "प्रदूषणमुक्त पर्यावरण हीच खरी संपत्ती आहे", असेही मत व्यक्त करण्यात आले.

# राज्य पुरस्कृत आवास योजनेमध्ये कारखेडा ग्रा. पं.राज्यात दुसरी



प्रतिनिधी मंगेश खाडे
केंद्रीय मंत्री व मुख्यमंत्री हस्ते स्वीकारला पुरस्कार
मानोरा: सन २०२२ २३ मध्ये राज्य शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून राज्यात दुसरी आल्याने केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते दि.३ रोजी कारखेडा ग्रामपंचायत च्या सरपंचा सौ.सोनाली बबनराव सोळंके व सचिव शामराव जगन्नाथ महाले यांनी पुणे येथे सत्कार करण्यात आला कारखेडा ग्रामपंचायत ने सन २०२२ २३ मध्ये राज्य शासन पुरस्कृत रमाई आवास योजनेची प्रखर अंमलबजावणी केली होती त्याची दखल राज्य शासनाने घेतली.

# जागतिक पर्यावरण दिन साजरा मानोरा येथे साजरा

किरण जैन.
मानोरा : आजच्या काळात वाढते प्रदूषण वाढते प्लास्टिक हवामान बदल तापमान वाढ आणि जलसंकट यांसारख्या समस्यांनी संपूर्ण जग घालून गेले आहे. अशा परिस्थितीत पर्यावरण संवर्धन ही एक गरज नाही, तर अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे. पर्यावरण संवर्धनाचे सर्वात प्रभावी आणि सहज नैसर्गिक साधन म्हणजे ते म्हणजे वृक्षारोपण. वृक्ष हे केवळ प्राणवायू देणारे जीव नाहीत, तर हे पर्यावरणाचे रक्षक सुद्धा आहेत. वृक्षारोपणाची आपल्याला खूप गरज आहे आणि आपण ते मान्य करतो. पण अनेकदा ही केवळ एखाद्या ठराविक दिवशी, म्हणजे जागतिक पर्यावरण दिन, म्हणजेच वन महोत्सव सप्ताह. फोटोसाठी झाडे लावली जातात, आणि नंतर त्यांची निगा, देखभाल, त्यांना पाणी देणे या सर्व गोष्टींकडे सर्वांचे दुर्लक्ष होते.

# किनवट येथे शांतता कमिटीची बैठव संपन्न

## सण उत्सवाच्या काळात पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे-पोलीस निरीक्षक चोपडे

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
किनवट : बकरी ईद निमित्त किनवट येथील पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली शांतता कमिटीची बैठक संपन्न झाली. आगामी काळात येणाऱ्या बकरी ईद या सना प्रसंगी शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच शासनाने दिलेले सर्व नियम सर्वांनी पाळून बकरी ईदसण-उत्सव साजरा करावा अशा सूचना पोलीस प्रशासनातर्फे देण्यात आल्या. माजी नगराध्यक्ष इशा खान,के. मूर्ती साजिद खान, बिभीषण पाळवदे,विवेक ओंकार यांनी समाज बांधवांना व सर्व नागरिकांना सदरील बकरी ईद काळात शांतता व सुव्यवस्था राखत पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन आपल्या मनोगतातून व्यक्त केले. बकरी ईद व आगामी काळामध्ये येणारे सर्वच सण-उत्सवात



राजकीय सामाजिक कार्यकर्ते पत्रकार यांनी या काळात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी केले. यावेळी जिल्हा नियोजन समिती सदस्य बाळकृष्ण कदम पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद पोहरकर सचिव बालाजी सिरसाट कार्याध्यक्ष किरण ठाकरे,पत्रकार तगाले यांच्यासह तालुक्यातील पोलीस पाटील तसेच विविध पक्ष संघटनांचे पदाधिकारी समाज बांधव उपस्थित होते.याशांतता कमिटी बैठकीचे सूत्रसंचलन पोलीस कर्मचारी श्री.बोदमवाड यांनी केले तर आभार पोलीस

# माजलगाव तेलगाव रस्त्याचे डांबरीकरण न झाल्यास मंत्र्यांना व सत्ताधारी आमदारला माजलगावात फिरु देणार नाही भाई ॲड. नारायण गोले, पाटील नवीदोद्दीन सिद्दिकी

माजलगाव / प्रतिनिधी माजलगाव तेलगाव रस्त्याची डांबरीकरण तात्काळ करण्यात यावे व या रस्त्यावर दररोज होणारे अपघात टळावेत यासाठी शेतकरी कामगार पक्ष व समाजवादी पक्ष व इतर काही मित्र पक्षाच्या वतीने दि.५/६/२०२५ रोजी सकाळी १०:०० ते ११:३० वि तब्बल दीड तास परभणी चौक माजलगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले रस्त्याचे डांबरीकरण न झाल्यास सरकारमधील मंत्र्यासह सत्ताधारी आमदारांना माजलगाव मतदार संघात फिरू देणार नाही. असा निर्वाणीचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी दिला. या उपोषणाला ऊर्जा, पाठबळ, पाठिंबा देणारे समाजवादी पार्टीचे तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी, मौलाना आझाद संघटनाचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस, तुकाराम नावडकर संभाजी ब्रिगेड, कॉंग्रेसचे हरिभाऊ सोळुंके, दत्ता कांबळे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विश्वंभर थावरे , सतीश कुरंगे, परमेश्वर डाके, बालासाहेब येवले, नारायण तौर, विलास जावळे, सय्यद फारुख, अभिषेक सोळंके, राहुल सोळंके, नाजर कुरेशी, भास्कर कांबळे, सचिन पांचाळ, हनुमान पांचाळ, जयराम राऊत, अविनाश



गोंडे, श्रीराम शेवाळे, श्रीकृष्ण कुरे, बालासाहेब फपाळ, डॉ. मनसबदार, राहुल सोनगुडे व इतर काही पक्षाचे नेते मंडळी कार्यकर्ते सह शेकडो नागरिकांनी या रास्ता रोको मध्ये सहभाग नोंदवला असून माजलगाव तेलगाव रस्त्याचा डांबरीकरण काम तात्काळ न झाल्या यापुढेही हा लढा चालू राहणार असल्याचा इशारा माजलगाव समाजवादी पार्टीचे तालुकाध्यक्ष नविदुद्दीन सिद्दिकी व मौलाना आझाद युवा मंच जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी दिला आहे.

# एमसीए परिक्षेत वैभवी देशमुखचे यश

माजलगाव । वार्ताहर येथील रहिवासी आणि जेएसपीएम संस्थेचे, राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, थातवडे पुणे महाविद्यालयातील विद्यार्थिनी वैभवी विनायक देशमुख हिने एमसीए (मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन्स) पदवी परीक्षेत उज्वल यश संपादन केले असून, महाविद्यालयीन स्तरावर तिने एमसीए ला ९.९७ एवढा सीजीपीए व आऊटस्टँडिंग ग्रेड प्राप्त करून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. वैभवीने एमसीए अंतिम वर्षाची परीक्षा अप्रतिम श्रेणीत उत्तीर्ण करताना विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्वक यादीत आपले स्थान निश्चित केले आहे. संगणक विज्ञान क्षेत्रातील आधुनिक कौशल्ये आत्मसात करताना तिने विविध प्रकल्प व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.



वैभवी देशमुखचे वडील सिद्धेश्वर महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. शिक्षणासोबतच वैभवी विविध सहशैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय होती. सादरीकरण, प्रोजेक्ट डेव्हलपमेंट, कोडिंग हॅकाथॉन यामध्ये तिने आपला ठसा उमटविला. भविष्यात आयटी क्षेत्रात उच्च पदावर काम करण्याची तिची महत्त्वाकांक्षा आहे. यशाबद्दल महाविद्यालयाचे एमसीए विभागाचे विभाग प्रमुख डॉ. रिंकू डूलो, प्रा. डॉ. सोनाली इंगोले, प्राध्यापक वर्ग, सहाध्यायी, कलावती पुंडलिक देशमुख, लीला प्रभाकर देशपांडे, ऋतुजा विनायक देशमुख, अतुल देशपांडे, सुरेश देशपांडे, नंदकुमार कुलकर्णी यांनी अभिनंदन केले आहे.

# यशाच्या शिखरावर टिकून राहण्याची गरज अतिरिक्त पोलीस अर्धीक्षक चेतना तिडके



अंबाजोगाई (प्रतिनिधी): यशाच्या शिखरावर पोहोचल्यावर कधी अपयश आले तर खचून न जाता परत उभे राहिले पाहिजे. आयुष्याच्या शिखरावर पोहोचल्यावर मोडून पडू नका असे प्रतिपादन अतिरिक्त पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी केले त्या बीड सहोदया संस्थेतर्फे पोदार इंटरनॅशनल स्कूल आंबेजोगाई येथे आयोजित दहावी व बारावी च्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. सविस्तर वृत्त असे की, कार्यक्रमाच्या सुरुवातीला पोदार इंटरनॅशनल स्कूल अंबेजोगाई चे प्राचार्य कीर्तीकुमार देशमुख यांनी प्रास्ताविक केले त्यानंतर शारदा इंग्लिश स्कूल केज चे प्राचार्य सोनल मिश्रा यांनी बीड सहोदया चा अहवाल सादर केला. या सोहळ्यासाठी प्रतिष्ठित अतिथी प्रा.अभिजीत लोहिया, ॲड. संतोष पवार, आणि फिजिक्सवाला अकॅडमीचे डॉन बॉस्को जोसेफ यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षणक्षेत्रातील व्यक्तींची उपस्थिती या कार्यक्रमाला शोभा देत होती. मुख्य वक्ता चेतना तिडके यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना जीवनाबद्दलचे महत्त्वाचे विचार मांडले. त्यांनी प्रसिद्ध अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्टच्या कवितेच्या ओळींचा संदर्भ देत विद्यार्थ्यांना जीवनसंघर्षाबद्दल प्रेरणा दिली. स्वतः चे सकारात्मक आणि नकारात्मक गुण लिहून काढा आणि त्यावर ठोस काम करा. सकारात्मक गुणातून आपल्याला नवी ऊर्जा मिळते आणि ती आपल्याला पुढे नेऊन जाते, असा व्यावहारिक सल्ला त्यांनी दिला. प्रा.अभिजीत लोहिया यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व पटवून दिले. अभ्यासाबरोबर आरोग्यावर सुद्धा लक्ष केंद्रित करावे. शारीरिक आणि मानसिक आरोग्याशिवाय केवळ पुस्तकी ज्ञान कामी येत नाही, असे त्यांनी प्रतिपादन केले. आधार माणुसकीचा फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. संतोष पवार यांनी विद्यार्थ्यांच्या भावी जीवनातील आव्हानांकडे लक्ष वेधले. दहावी आणि बारावी नंतरचा प्रवास हा खरोखरच खडतर प्रवास आहे. पुढील शिक्षणासाठी कुटुंबापासून दूर जावे लागणार आहे, त्यामुळे समाजामध्ये कसे वागावे, कसे जगावे यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे त्यांनी महत्त्वाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमातील सर्वात भावनिक क्षण म्हणजे बीड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या शौर्य मुगदिया या विद्यार्थ्याच्या आई डॉ.रेखा मुगदिया यांनी व्यक्त केलेले विचार होते. त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडावे आम्ही त्याचे पालक दोघेजण डॉक्टर असून आमचा मुलगा इंजीनियरिंगची तयारी करतो. बीड सहोदयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. एमआयटी शाळेचे प्राचार्य सागर राऊत यांनी बीड सहोदया ऑलिम्पियाडचा तपशीलवार अहवाल सादर केला. या कार्यक्रमात बीड सहोदया ओलंपियाड मधून जिल्ह्यात प्रथम द्वितीय आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचाही त्यांच्या पालकांसमवेत सत्कार करण्यात आला.या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोदार इंटरनॅशनल स्कूल आंबेजोगाईच्या अनुभवी शिक्षिकेने अत्यंत कुशलतेने केले.

# मुर्शदपुर येथील वादग्रस्त गाडी रस्ता विना खर्चाने झाला खुला : महसूल विभागाचा स्तुत्य उपक्रम

. बीड प्रतिनिधी -बीडच्या शेतकऱ्यांसाठी ठरतायत तारणहार महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी अनेक हिताचे निर्णय घेतले आहेत . बीडचे पालकमंत्री म्हणून पदभार घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी अधिकाऱ्यांना नियमानुसार कोणालाही न घाबरता नागरिकांची कामे तात्काळ करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत . बीडला लाभलेले जिल्हाधिकारी विवेक जॉनसन हे जनता दरबार घेऊन सर्वसामान्य जनतेची प्रश्न जागेवर सोडवत असल्याचे चित्र दिसत आहे . बीड जिल्ह्यात प्रशासनाने लोकोपयोगी कार्ये इतक्या मोठ्या प्रमाणात केल्याचे पहिल्यांदाच दिसून दिसून येत आहे . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे नेहमी तहसीलदारांना शेतकऱ्यांची रस्त्याची कामे तातडीने करून द्यावी असे सांगत असतात . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव ह्या सर्वसामान्य जनतेप्रती अत्यंत कनवाळू आहेत . गरीब शेतकऱ्यांची कामे कोणत्याही परिस्थितीत अडविता कामा नये , असा त्यांचा कटाक्ष असतो . नुकतेच सेवानिवृत्त झालेले विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी शेतकऱ्यांसाठी स्वस्त अशी सस्ती अदालत योजना राबविली . या योजनेत ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचे रस्त्याचे प्रश्न निर्माण झालेले असतील त्या ठिकाणी महसूल विभागाने वादी आणि प्रतिवादी यांच्याशी चर्चा करून सामोपचाराने रस्त्याचे प्रश्न सोडवण्यास सुरुवात केली आहे . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या आदेशावरून मुर्शदपूर लिंबा गावातील अर्जदार सुभाष आत्माराम जगताप व इतर यांनी गट नंबर 182 पर्यंत जाण्यासाठीचा गाडी रस्ता खुला करून मिळणेबाबत अर्ज केला होता . या अर्जानुसार सस्ती अदालत मोहिमेअंतर्गत प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन राजुरी नवगणचे मंडळ अधिकारी प्रभू येवले व ग्राम महसूल अधिकारी नवनाथ तांदळे यांनी अर्जदार व गैरअर्जदार यांचे समक्ष स्थळ पाहणी केली . चौकशी करून त्यांच्याशी चर्चा करून निर्माण



झालेल्या रस्त्याच्या प्रश्नाबाबत आपापसात समेट घडवून आणला . वाद घातल्यास एकमेकांशी संबंध तर खराब होतातच परंतु अर्ज फाटे करणे , तहसील कार्यालय , उपविभागीय अधिकारी कार्यालय या ठिकाणी चकरा मारून वेळेचा व पैशाचा अपव्यय होतो , ही बाब त्यांना समजावून सांगितली . ही गोष्ट अर्जदार आणि गैरअर्जदार यांच्या लक्षात आली त्यामुळे त्यांनी आम्ही यापुढे वाद घालणार नाही व सामोपचाराने प्रस्ताव करून घेण्यास तयार आहोत अशी संमती दिली. त्यांनतर या ठिकाणचा गाडीरस्ता अर्जदार व गैरअर्जदार तसेच ग्रामस्थ यांचे समक्ष खुला करण्यात आला . हा रस्ता गावच्या मुख्य रस्त्यापासून अर्जदार यांचे शेतापर्यंत जवळपास 500 मीटर अंतराचा असून तो खुला करण्यात आला . सदर प्रक्रियेस लगतच्या दोन्ही बाजूचे शेतकरी यांनी सामंजस्य दाखवून रस्ता खुला करून देऊन शासनास एक प्रकारे सहकार्य केले . ज्यामुळे अर्जदार व इतर यांना निर्माण झालेल्या रस्त्याचा प्रश्न सोडवणे शक्य झालेले आहे . सदर रस्ता खुला करण्यात आल्यामुळे तेथून जाणाऱ्या कमीत कमी 20 ते 25 शेतकऱ्यांचा रस्त्याचा प्रश्न सुटलेला आहे . हा रस्ता खुला करते वेळी मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी व शेतकरी रावसाहेब बापूराव जगताप , नितीन लक्ष्मण जगताप , सचिन रामदास जगताप , बप्पासाहेब विनायक जगताप , बळीराम चंद्रभान जगताप , यशवंत जनार्दन जगताप , आसाराम रामचंद्र जगताप , जगन्नाथ रामचंद्र जगताप , योगेश शाळीग्राम जगताप , नवनाथ गंगाधर जगताप इत्यादी हजर होते .

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी हजर झाल्यापासून त्यांच्या अधिनस्त नायब तहसीलदार सुहास हजारे ,नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , नायब तहसीलदार सुरेंद्र डोके , पुरवठा निरीक्षण अधिकारी प्रशांत सुपेकर यांच्या मदतीने व मंडळ अधिकारी , तलाठी यांच्या मदतीने सुशासन राबविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते . त्यामुळे सर्वसामान्य जनतेतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे . .




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
आंतरराष्ट्रीय



# पाकिस्तान वठणीवर, भारताच्या अटींवर चर्चेस तयार,

भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत केलेल्या कारवाईनंतर पाकिस्तान वठणीवर आले आहे. पाकिस्तानला आता भारतासोबत चर्चा हवी आहे. पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक डार यांनी त्यासंदर्भात वक्तव्य केले आहे. ते म्हणाले, भारतासोबत चर्चेसाठी इस्लामाबादची तयारी आहे. आमचा देश प्रत्येक स्तरावर चर्चा करण्यास तयार आहे. भारतासोबत आम्हाला व्यापक चर्चा करायची आहे. सर्व मुद्यांवर चर्चा करणार रॉयटर्सने दिलेल्या बातमीनुसार, इस्लामाबादमधील एका पत्रकार परिषदेत इशाक डार यांनी म्हटले की, भारत जेव्हाही चर्चेसाठी म्हणत असेल, तेव्हा चर्चा करण्याची आमची तयारी आहे. कोणत्याही स्तरावर आम्ही चर्चा करण्यास तयार आहोत. चर्चेसाठी आमची तयारी असली तरी आम्ही निराश झालेलो नाही. पाकिस्तान सर्वच मुद्यांवर चर्चा करु इच्छितो. परंतु भारत फक्त दहशतवाद्यावर फोकस करत आहे. डार यांनी म्हटले की, चर्चेसाठी दोन लोकांची गरज असते. चर्चेसाठी आमच्या इतके गंभीर इतर कोणीच नाही. डार यांचे संकते भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांच्या वक्तव्याकडे होते. जयशंकर यांनी म्हटले होते की, पाकिस्तासोबत चर्चा दहशतवादाचा मुद्यावर




होणार आहे. पाकिस्तान व्याप्त काश्मीर रिकामे करण्यावर होणार आहे. पुन्हा संघर्षाची शक्यता नाही... भारतासोबत नव्याने संघर्ष होण्याची शक्यता विचारली असता, डार म्हणाले की, भविष्य आम्ही सांगू शकत नाहीत, परंतु अशा कोणत्याही परिस्थितीची शक्यता खूपच कमी आहे. शस्त्रसंधीचा निर्णय अबाधित राहणार आहे. दोन्ही बाजूंनी सैन्य मागे घेण्याशी संबंधित सर्व पावले अंमलात आणली आहेत. या परिस्थितीत पुन्हा संघर्ष होण्याची शक्यता नाही, असे त्यांनी म्हटले. पहलगाव येथे २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. त्यात २६ पर्यटकांची हत्या दहशतवाद्यांनी केली होती. त्यानंतर भारताने ६ ते ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तान आणि पाक व्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची तळ नष्ट केली होती. भारताच्या ऑपरेशननंतर पाकिस्तानकडून करण्यात आलेले सर्व ड्रोन हल्ले आणि क्षेपणास्त्र हल्ले भारताने परतवून लावले होते. यामुळे पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचा प्रस्ताव आल्यानंतर १० मे रोजी शस्त्रसंधी करण्यात आली. महिन्याच्या सात तारखेला येणारं संकट काही केल्या पाकिस्तानची पाठ सोडायला तयार नाही, 7 मे 2025 च्या रात्री भारतानं ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानवर एअर स्ट्राईक केला. या एअर स्ट्राईकमध्ये पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे 9 अड्डे उद्धस्त झाले, तसेच 100 हून अधिक दहशतवादी ठार झाले. आता पुन्हा एकदा अशी चर्चा सुरू झाली आहे की, सात जूनला पाकिस्तानमध्ये काहीतरी मोठं घडणार आहे, या संदर्भातील भाकीत पाकिस्तानी एक्सपर्टकडून वर्तवण्यात आलं आहे.

# रशियाने बदला घेतला, यूक्रेनवर मोठा हल्ला, बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा पाऊस, ड्रोनने हल्ले

रशिया युक्रेन युद्ध आणखी गंभीर वळणावर येऊन पोहचले आहे. युक्रेनच्या ऑपरेशन स्पायडर वेबला रशियाने उत्तर दिले आहे. रशियाने युक्रेनवर मोठा हल्ला केल्याचे वृत्त सीएनएनने दिले आहे. रशियाने युक्रेनवर अनेक दिशांनी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागले आहे. रशियाने एकाच वेळी अनेक ठिकाणांना लक्ष्य केले आहे. या हल्ल्यात युक्रेनची किती नुकसान झाले? त्याची माहिती समोर आली नाही. सीएनएनच्या वृत्तानुसार, युक्रेनच्या हवाई दलाने म्हटले आहे की, रशियाने बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन वापरून युक्रेनवर अनेक दिशांनी हल्ला केला आहे. हवाई दलाकडून ही माहिती त्यांच्या अधिकृत टेलिग्राम चॅनेलवर शेअर दिली आहे. रशियाच्या हल्ल्यादरम्यान राजधानी कीवमध्ये अनेक ठिकाणी स्फोट झाले. कीव शहर लष्करी प्रशासनाचे प्रमुख तैमूर तकाचेन्को यांच्या मते, रशियाकडून झालेल्या हल्ल्यांमुळे अनेक इमारतींना आग लागली. सोलोम्यान्स्की जिल्ह्यातील एका उंच इमारतीचे नुकसान करून निवासी क्षेत्रांना रशियाने लक्ष्य केल्याचा आरोप तकाचेन्को यांनी केला आहे. दरम्यान, रशियाकडून होणाऱ्या हल्ल्यामुळे कीवचे महापौर विटाली क्लिट्स्चको यांनी लोकांना शेल्टरमध्ये राहण्याचा सल्ला दिला आहे. त्यांनी होलोसिएव्हस्की आणि डार्निट्स्की जिल्ह्यात अनेक ठिकाणी आग लागल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. त्यांनी सांगितले की, राजधानीच्या ओबोलोन भागात युक्रेनची हवाई संरक्षण यंत्रणा सक्रिय करण्यात आली आहे. युक्रेनच्या हल्ल्यात रशियाचे मोठे नुकसान युक्रेनने नुकतेच रशियावर हल्ला केला होता. युक्रेनच्या या हल्ल्यात रशियाचे मोठे नुकसान झाले होते. रशियाची 41 लढाऊ विमाने नष्ट झाली होती. तसेच टीयू-95, टीयू-22 आणि ए-50 या हवाई रडारलाही यूक्रेनने नुकसान पोहचवले होते. त्यानंतर रशियाने त्या हल्ल्याचा बदला घेण्याचा निर्णय घेतला. युक्रेनच्या हल्ल्यानंतर रशियाचे माजी राष्ट्राध्यक्ष दिमित्री मेदवेदेव यांनी टेलिग्रामवरील एका पोस्टमध्ये लिहिली होती. त्यांनी या हल्ल्यावर चिंता व्यक्त करताना बदल्याची वाट पाहत आहेत, असे म्हटले होते. मेदवेदेव यांच्या वक्तव्यानंतर रशियाकडून युक्रेनवर मोठा हल्ला होईल, ही शक्यता व्यक्त केली जात होती.

## पाकिस्तानी सैन्याला मोठा दणका, बलूचिस्तान पाकिस्तानच्या हातातून निसटतोय



बलूचिस्तान पाकिस्तानच्या हातातून निसटत चाललाय. BLA च्या फायटर्सनी पाकिस्तानी सैन्याला गुडघ्यावर आणलय. बलूचिस्तान लिबरेशन फ्रंट सतत पाकिस्तानी सैन्यावर हल्ल्याचे व्हिडिओ रिलीज करतोय. गुरुवारी BLA ने एका हल्ल्यात 5 पाकिस्तानी सैनिक मारल्याची माहिती दिली. पाकिस्तानसाठी आता बलूचिस्तानवर नियंत्रण ठेवणं दिवसेंदिवस कठीण बनत चाललय. अलीकडे त्यांना सतत मोठ्या नुकसानीला सामोरं जावं लागतय. बलूच लिबरेशन आर्मीच्या फायटर्सनी जमुरान आणि क्वेटा या दोन ठिकाणी वेगवेगळ्या हल्ल्यात पाकिस्तानी सैन्याला टार्गेट केलं. त्यामध्ये पाच सैनिकांचा मृत्यू झाला. एका अधिकाऱ्यासह अनेक जण जखमी झाले.

बलूच फायटर्सनी केचच्या जमुरान भागात कुंड कापरान येथे पाकिस्तानी सैन्याच्या ताफ्यावर घात लावून हल्ला केला. हल्ल्यात पाकिस्तानी सैन्याची दोन वाहनं नष्ट झाली. या हल्ल्यात पाच सैनिकांचा जागीच मृत्यू झाला. अनेक जखमी झाले. अशाच प्रकारचा हल्ला सोमवारी BLA ने क्वेटाच्या पूर्व बायपास बकरा मंडीजवळ केला होता. यात एका पोलीस वाहनाला टार्गेट करुन ग्रेनेड हल्ला करण्यात आला होता.

## आता पाकिस्तान-चीनची खैर नाही, भारत हायपरसोनिक क्षेपणास्त्राची चाचणी घेणार



भारत आपल्या संरक्षण प्रणालीवर कोट्यावधी रुपये खर्च करत आहे. परकीय शत्रूंना धडा शिकवण्यासाठी भारत अनेक स्वदेशी बनावटीची क्षेपणास्त्रे विकसित करत आहे. याचाच एक भाग म्हणून संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (DRDO) लवकरच एक्सटेंडेड ट्रॅजेक्टरी ___लाँग ड्युरेशन हायपरसोनिक क्रूझ मिसाईल (ET-LDHCM) ची चाचणी घेणार आहे. हे भारतातील सर्वात प्रगत हायपरसोनिक तंत्रज्ञान मानले जात आहे. हे क्षेपणास्त्र प्रोजेक्ट विष्णूचा भाग आहे. यामुळे भारताच्या शेजारील देश पाकिस्तान आणि चीनवर नियंत्रण ठेवणे भारतासाठी सोपे जाणार आहे. भारताचे ET-LDHCM म्हणजे एक्सटेंडेड ट्रॅजेक्टरी ___लाँग ड्युरेशन हायपरसोनिक क्रूझ मिसाईल हे असे क्षेपणास्त्र आहे जे ध्वनीच्या वेगापेक्षा 5 पट जास्त वेगाने उडू शकते. यायाची 2020 मध्येही यशस्वी चाचणी घेण्यात आली होती. ओडिशाच्या किनाऱ्यावरील डॉ. एपीजे अब्दुल कलाम बेटावर ही चाचणी झाली होती

# डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयाचा भारताला मोठा धक्का, ३९ हजार कोटी रुपयांची निर्यात धोक्यात

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतील स्टील आणि ॲल्युमिनियम उत्पादनांवर ५०% कर लावण्याचा निर्णय घेतला आहे. याचा फटका भारतासह जगभरातील देशांना बसणार आहे. याचा परिणाम भारताच्या निर्यातीवर, स्थानिक उत्पादनावर, किंमतींवर आणि व्यापारावर परिणाम होण्याची शक्यता आहे. सध्या भारतीय स्टील कंपन्या स्थिर आहेत. मात्र तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, आगामी काळात याचा फटका भारताला बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे भारताच्या ३९ हजार कोटींच्या उत्पादनांना फटका




बसण्याची शक्यता आहे. भारतातील लोखंड किंवा स्टीलपासून बनलेल्या उत्पादनांचा याचा बसू शकतो. खासकरुन ऑटोमोबाईल्स, ऑटो पार्ट्सच्या निर्यातीवर येणाऱ्या काळात अप्रत्यक्ष परिणाम होऊ शकते. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या टॅरिफ धोरणामुळे जागतिक व्यापार परिस्थिती बदलू शकते, ज्यामुळे भारतासह अनेक देशांच्या निर्यातदारांना नवीन आव्हानांना तोंड द्यावे लागू शकते. भारताच्या निर्यातीवर परिणाम होणार भारतात बनलेल्या बऱ्याच वस्तू अमेरिकेला निर्यात केल्या जातात. म्हणजेच अमेरिका ही भारतासाठी एक महत्त्वाची निर्यात बाजारपेठ आहे. स्टील आणि ॲल्युमिनियम उत्पादनांवर ५०% कर लादल्याने भारताकडून अमेरिकेला होणारी निर्यात कमी होऊ शकते. याचा परिणाम भारतातील स्टील आणि ॲल्युमिनियम उद्योगावर होऊ शकतो. कारण कर वाढल्याने उत्पादनांच्या मागणीत घट होण्याची शक्यता आहे. ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह (GTRI) च्या आकडेवारीनुसार, भारताने आर्थिक वर्ष 25 मध्ये अमेरिकेला सुमारे $4.56 अब्ज किमतीचे स्टील, ॲल्युमिनियम आणि संबंधित उत्पादने निर्यात केलेली. यात लोह आणि स्टील उत्पादनांची निर्यात $587.5 दशलक्ष, लोह किंवा स्टील वस्तूंची निर्यात $3.1 अब्ज, ॲल्युमिनियम आणि संबंधित वस्तूंची निर्यात $860 दशलक्ष इतकी आहे. यातील बहुतांशी उत्पादने ही महाराष्ट्र, गुजरात आणि तामिळनाडू येथील आहेत. स्थानिक उत्पादन आणि किमतींवर परिणाम होणार डोनाल्ड ट्रम्प यांनी लावलेल्या या ५० टक्के कराचा उद्देश अमेरिकेतील स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन देणे आहे. यामुळे देशांतर्गत उत्पादकांना फायदा होणार आहे. यामुळे अमेरिकेत स्टील आणि ॲल्युमिनियमच्या किमती वाढू शकतात. याचा परिणाम थेट अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.

# राफेलची बॉडी तयार होणार भारतात, टाटाच्या या कंपनीची मोठी डील

एक मोठी वार्ता समोर येत आहे. संरक्षण क्षेत्रात विविध प्रयोग सुरू आहे. आता राफेल फायटर जेटविषयी महत्त्वाची अपडेट समोर येत आहे. राफेल लढाऊ विमानाची बॉडी पहिल्यांदा फ्रान्सबाहेर, भारतात तयार होणार आहे. टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम आणि डसॉल्ट एव्हिएशनने भारतात राफेल लढाऊ विमानाची बॉडी तयार करण्यासाठी चार करारावर स्वाक्षरी केली आहे. पहिल्यांदाच या लढाऊ विमानाच्या बॉडी उत्पादनाची जबाबदारी फ्रान्सबाहेर सोपविण्यात आली आहे. राफेलने पाकला



दिवसा दाखवले तारे भारत आणि पाकिस्तानमध्ये मोठा तणाव निर्माण झाला होता. भारताने केलेल्या कारवाईत पाकिस्तानचे कंबरडे मोडले. त्याचदरम्यान राफेल फायटर जेटची मोठी चर्चा झाली. भारतीय वायुदलाच्या ताफ्यातील राफेलने सीमा पार करून पाकिस्तानला दिवसा तारे दाखवले. आता राफेलची बॉडी भारतात तयार होण्याची बातमी समोर आली आहे. राफेल तयार करणारी कंपनी द सॉल्ट एव्हिएशनने एक मोठा निर्णय घेतला आहे. दसॉल्ट एव्हिएशन आणि टाटा समूह मिळून भारतात राफेल फायटर जेटची बॉडी तयार करणार आहे. त्यासाठी या दोन्ही कंपन्यांमध्ये 4 उत्पादनाविषयीच्या हस्तांतरण करारावर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. एका शक्यतेनुसार, या करारातंर्गत राफेलचा पहिला Fuselage बाहेर पडेल. हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत होईल त्यावेळी प्रत्येक महिन्याला 2 2 Fuselage तयार होतील दसॉल्टचे अध्यक्ष म्हणाले काय? दसॉल्ट एव्हिएशन आणि टाटा समूहामध्ये करण्यात आलेला करार ऐतिहासिक मानण्यात येत आहे. फ्रान्सच्या बाहेर पहिल्यांदाच या फायटर जेटचे पार्टस बाहेर तयार होतील. दसॉल्ट एव्हिएशनचे चेयरमन आणि CEO म्हणाले की, पहिल्यांदाच राफेलच्या fuselage चे उत्पादन फ्रान्सबाहेर करण्यात येईल. भारतात आमची पुरवठा साखळी अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय आहे. भारतीय एअरोस्पेस उद्योगातील प्रमुख कंपनी TASL सह स्थानिक इतर भागीदारांचे या विस्तारासाठी मनापासून धन्यवाद. आमच्या पाठिंब्याने गुणवत्ता आणि स्पर्धेतील नैपुण्य टिकवून ठेवण्यात कमी पडणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com